# प्रेस नोट दि.१३/१०/२०१८
## बिबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर
## वैश्या व्यवसायातून दोन पिडीत महिलांची सुटका केले बाबत

दि.१२/१०/२०१८ रोजी बिबवेवाडी पोलीस ठाणेकडे नेमणुकीस असलेले पोलीस शिपाई धुमाळ १२०२७ व शितोळे ८१६१ यांना गणेश नगर अप्पर बिबवेवाडी पुणे येथील एका घरामध्ये १)मधुकर जाधव २) सुधाकर जोहरे ३) नवनाथ भगत व महीला नामे विदया कांबळे हे दोन मुलींना वेश्या व्यवसायाकरीता बोलावुन घेवुन त्यांना पैशाचे आमीष दाखवुन त्यांच्याकडे गि-हाईक पाठवुन त्यांच्याकडुन वेश्या व्यवसाय करुन घेत आहेत व वेश्या व्यवसायाकरीता विदया कांबळे,नवनाथ भगत, सुधाकर जोहरे, मधुकर यादव यांनी सदर ठिकाणी दोन मुलीनां वेश्या व्यवसायासाठी ठेवल्या आहेत. अशा मिळालेल्या बातमी वरुन श्री अजित लकडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुणे, पोलीस उपनिरीक्षक श्री वाघमारे, पोलीस शिपाई ८१६१ शितोळे,पोलीस शिपाई ८८८० शिंदे, पोलीस शिपाई ७५४६ देवकाते, पोलीस शिपाई ८६७८ कुलकर्णी तसेच महिला पोलीस शिपाई ७१९८ मोटे व महिला पोलीस शिपाई १०८९६ गायकवाड अशी एक टीम तयार करुन बातमीच्या ठिकाणी छापा टाकुन कारवाई केली असता एजंट १) विदया मधुसूधन कांबळे वय ३२ वर्षे रा स.नं.६४८/२ गणेशनगर बी ११२ सुप्पर इंदिरानगरच्या पुढे बिबवेवाडी पुणे २) सुधाकर ओंकार जोहरे वय २७ वर्षे रा येवलेवाडी बोपदेव घाट पायथ्याशेजारी कोंढवा पुणे ३) नवनाथ दामोदर भगत वय ३२ वर्षे रा स.नं. १९/१८ टेल्को कॉलनी दत्तनगर आंबेगाव बु।। पुणे ४) मधुकर श्रीपती यादव वय ३९ वर्षे रा स.नं.३४ गणेशनगर पाफळवस्ती बिबवेवाडी पुणे. यांनी दोन पिडीत महिला यांना वेश्या व्यवसाय करीता प्राप्त करुन घेवुन त्यांना पैशांचे अमिष दाखवुन वेश्या व्यवसायास प्रवृत्त करुन त्यांचेकडुन वेश्याव्यवसाय करवून घेवन त्यातुन मिळणारी कमाई स्वतःच्या उपजीविके करीता वापरताना मिळुन आल्याने आरोपीतांना गुन्हयात अटक करण्यात आली असुन पिडीत महिलांना संरक्षण कामी रेस्क्यु फांऊडेशन हडपसर पुणे येथे दाखल करण्यात आले आहे.सदर बाबत बिबवेवाडी पोलीस स्टेशन गु.र.नं.२७७/२०१८ इटपा ॲक्ट १९५६ चे कलम ३, ४, ५, सह भादंवि कलम ३७०, ३७० (अ) ३४.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पुर्व विभागाचे प्रभारी अपर पोलीस आयुक्त मा.श्री रविंद्र सेनगावकर,पोलीस उप आयुक्त,परि-५ मा.श्री प्रकाश गायकवाड व सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग मा. श्री मिलिंद पाटील यांचे नेतृत्वा खाली व.पो.नि. श्री अजित लकडे, पो.नि.गुन्हे श्री राजेंद्र जाधव पोलीस उपनिरीक्षक श्री वाघमारे, पोलीस शिपाई ८१६१ शितोळे,पोलीस शिपाई ८८८० शिंदे, पोलीस शिपाई ७५४६ देवकाते, पोलीस शिपाई ८६७८ कुलकर्णी तसेच महिला पोलीस शिपाई ७१९८ मोटे व महिला पोलीस शिपाई १०८९६ गायकवाड यांनी पार पाडली.